## प्रेस नोट

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ०८/०४/२०१९

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | प्रकाश निंभाजी चव्हाण, वय ५२ वर्षे, पद : शाखा अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अचलपूर, जि.अमरावती, वर्ग २ |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | ०८.०४.२०१९ चे १८.५० वा. |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | ३५,०००/— |
| ५ | तडजोडीअंती मागणी करुन स्विकारलेली लाच रक्कम | ३०,०००/— |
| ६ | घटनास्थळ | कठोरा नाका बस स्टॉपजवळ, अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार हे शासकिय कंत्राटदार असुन त्यांनी दिनांक ०८.०४.२०१९ रोजी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान आलोसे प्रकाश निंभाजी चव्हाण, शाखा अभियंता यांनी तक्रारदार यांना त्यांनी जिल्हा परिषद, अमरावती बांधकाम अपविभाग अचलपूर अंतर्गत केलेल्या रस्त्याचे कामाचे मोजमाप घेवून मुल्यांकन करुन दिल्याबद्दल मंजुर बिलाचा धनादेश प्राप्त झाल्यावर मंजुर बिलाचे २ टक्के प्रमाणे ३५,०००/— रुपये मोबदला म्हणून पंचासमक्ष लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ३०,०००/— स्विकारण्याचे मान्य केले.

त्यानंतर आयोजित सापळा कारवाई दरम्यान आलोसे प्रकाश चव्हाण, शाखा अभियंता, जि.प. बांधकाम उपविभाग, अचलपूर यांनी तक्रारदार यांचेकडून मागणी केलेली लाच ३०,०००/— रुपये पंचासमक्ष स्विकारतांना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. नमुद आरोपीविरुध्द पो.स्टे.गाडगेनगर, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही श्री.श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती श्री.पंजाबराव डोंगरदिवे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पोलीस उपअधीक्षक गजानन पडघन, पो.हवा.चंद्रशेखर दहेकर, पो.ना.सुनिल व—हाडे, पो.कॉ.अभय वाघ, पो.कॉ.महेंद्र साखरे, पो.ना.चंद्रकांत जनबंधु यांनी पार पाडली. नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क** : अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५, २५५३०५५
टोल फ्रि नंबर —१०६४

(गजानन पडघन)
पोलीस उपअधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
मो.नं.९९२३७३८१००

Scanned by CamScanner